दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५४ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.५ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## देवेंद्र फडणवीसांचा काँग्रेसवर हल्लाबोल

# देशात 'गरीबी हटाओ'चे नारे दिले गेले पण प्रत्यक्ष लाभ नरेंद्र मोदींच्या काळात मिळाला



**जळगाव–या देशात गरीबी हटावचे नारे दिले जात असे पण गरीबी हटली नाही. पण मोदीजींनी करून दाखवले. पहिल्यांदा देशात गरीबांकरीता योजना तयार झाल्या आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ देखील त्यांना मिळाला. जगातील ५ वी अर्थव्यवस्था मोदींनी केली. गरीबांच्या कल्याणातून देशाची अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकते हे मोदींनी करून दाखवले, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तर त्यांनी काँग्रेस काळातील धोरणांवर हल्लाबोल केला. ते जळगावात बोलत होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा जळगाव दौऱ्यावर होते. तत्पूर्वी फडणवीसांनी व्यासपिठावरून मोदी सरकारच्या कामकाजावर भाष्य केले.**

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आज आनंदाची गोष्ट आहे. या खान्देशाच्या तरुणाईला साद घालण्यासाठी व दिशा दाखविण्यासाठी देशाचे गृहमंत्री अमित शहा आले आहेत. विकसीत भारताचे जे स्वप्न मोदींनी दाखवले आहे, त्यात अग्रेसर येण्याचे काम ही जळगावची नगरी करत आहे.काळापैसा बाहेर काढून गरीबांच्या कल्याणासाठी त्याचा वापर केला. विकसीत भारताच्या संधी मिळतात. पंख तयार करण्याचे काम मोदीजींनी केले आहे. पुढच्या ४ वर्षांमध्ये जगातील तिसरी अर्थव्यवस्था ही भारताची आहे. गरीबीचे निर्मूलन होतच आहे. पण त्याचबरोबर गरीबांच्या व युवकांसाठी रोजगाराच्या संधी तयार केल्या आहेत. तर यापुढे देखील अर्थव्यवस्था व रोजगाराच्या संधी येणार आहेत. वंदे भारत ट्रेन या देशात तयार झाली. विदेशामध्ये ज्या पद्धतीने ट्रेन आहे अगदी तशीच व त्याहूनही प्रगत रेल्वे भारतात उपलब्ध करून दिली. विमानतळाप्रमाणेच देशातील रेल्वेस्थानक केली जात आहेत. एव्हाना तशी निर्माण देखील झाली आहेत.सैन्य दलातील अधिकारी म्हणायचे की, चीनने बॉर्डरपर्यंत रस्ता केला. पण आमच्याकडे रस्ता नाही. त्यावेळी काँग्रेस सरकार म्हणायचे रस्ता तयार केला चीनला फायदा होईल. पण मोदींच्या काळात चांगले कामे झाली. चीन, पाकिस्तानच्या सीमेपर्यंत भारताने रस्ते तयार केले. त्यामुळे पाकिस्तान, चीन सारखे देशांची आता भारताकडे डोळे वटारून पाहण्याची क्षमता नाही. जगातील अनेक देशांना जमले नाही ते दक्षिण ध्रुवावर मोदींजींच्या नेतृत्वात आपल्या शास्त्रज्ञांनी चांद्रयान उतरूण दाखवले, हे सर्व मोदींच्या काळात घडत आहे, देशाची प्रगत होत आहे, असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले.नरेंद्र मोदी यांनी आपली जागतिक नेतृत्व निर्माण केले. जगातील १०० देशांना मोदींनी कोविड लस दिली. ते देश देखील मोदींचे आभार मानत आहेत. मला विश्वास आहे. बिघडलेली घडी व्यवस्थित केली आहे. गेली दहा वर्षे तयारी झाली आहे. तर पुढचे पाच वर्षे विकासाची गाडी वेगाने धावणार आहे. पुढचे पाच वर्षे मोदींनी निवडून द्यायचे आहे. भारताला सर्वोच्च शिखराला नेण्यासाठी मोदींना मत द्यायचे नाही तर देशासाठी हे मत असेल असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# वर्धेत राडा होता होता राहिला; १० जीवंत कारतुससह २ बंदुका जप्त



**वर्धा (प्रतिनिधी)–दोन वर्षांसाठी हद्दपार असलेल्या अट्टल गुन्हेगार जीवंत काडतूस व दोन बंदुकांसह वर्धेत असल्याच्या माहितीवरून स्थानिक तारफैल येथून शेख रहीम शेख रशीद (३८) रा. आनंदनगर याला तर बंदूक विकणार्याला पुलगाव येथुन अटक करण्यात आली. पोलिसांनी २ बंदूक व १० जीवंत काडतूस जप्त केले. बंदूक आणि काडतूस घेऊन असल्याने शहरात कुठेतरी राडा होण्याची शक्यता होतीअशी शंका पोलिसांनी वर्तवली.**



पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांना मिळालेल्या माहितीवरून हद्दपार असलेला आरोपी शेख रहीम शेख रशीद (३८) रा. आनंदनगर हा तारफैल परिसरात साहाना परवीन शेख हिच्या घरी आला असुन त्याच्याकडे गावठी बनावटीचे बंदूक असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पोलीस साहाना शेख हिच्या घराकडे जात असताना त्यांना रस्त्यावरच शेख रहीम शेख रशीद हा बंदूक घेऊन दहशत पसरवत असल्याचे दिसुन आला. पोलिसांनी त्याला मोठ्या शिताफितीने ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ५ जीवंत काडतूससह मॅग्झीन असलेली गावठी बंदूक सापडली. शेख रहिम याची चौकशी केली असता त्याने आणखी एक बंदूक साहाना शेख हिच्या घरी ठेवली असल्याची माहिती त्याने दिली. साहानाच्या घराची पाहणी केली असता तिच्याकडे गावठी बनावटीची पुन्हा एक बंदूक व ५ जिवंत कारतुस मिळून आले. शस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याने त्याच्या ताब्यातुन २ गावठी बनावटीचे बंदूक, १० जिवंत कारतूस, २ मॅग्झीन व एक मोबाईल असा १ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.शेख रहीम शेख रशीद याच्यावर १५ गुन्हे नोंद असुन २ वर्षाकरिता वर्धा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नुरुल हसन, अपर पोलिस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक संजय गायकवाड, पोलिस निरीक्षक कांचन पांडे यांच्या निर्देशाप्रमाणे पोलिस अधिकारी उमाकांत राठोड, सलाम कुरेशी, हमीद शेख, नरेंद्र पाराशर, गजानन लामसे, चंद्रकांत बुरंगे, मनोज धात्राक, अरविंद येणूरकर, यशवंत गोल्हर, रितेश शर्मा, पवन पन्नासे, महादेव सानप, मनिष कांबळे, गोपाल बावणकर, संजय बोगा, अमरदीप पाटील, नितीन ईटकरे, मंगेश आदे, अभिषेक नाईक, विनोद कापसे, गजानन दरणे, गणेश खेबले, अल्का कुंभलकर यांनी केली.

### गावठी बंदुकीची पुलगावातून खरेदी

रशीद याला दोन्ही बंदूक व कारतुस कोठुन खरेदी केली याबाबत विचारले असता त्याने हमीद तुकूड्या शहा (४१) रा. आठवडी बाजार पुलगाव याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिल्याने त्यालाही अटक करण्यात आली.

# लोकसभेनंतर अजित पवारांच्या सर्वच आमदारांच्या पोस्टरवर शरद पवारांचे फोटो दिसतील:आमदार रोहित पवार



**मुंबई**–छत्रपती शिवाजी महाराज तसेच छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचण्याचे काम खासदार अमोल कोल्हे त्यांच्या कलेच्या माध्यमातून करत आहेत. मात्र, कोणी बोलून त्यांची किंमत कमी होणार नाही. त्यांची किंमत जनता ठरवत असल्याचे आमदार रोहित पवार म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार यांच्या गटातील सर्वच आमदारांच्या बॅनरवर शरद पवार यांचे फोटो दिसतील असा दावाही त्यांनी केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी खासदार अमोल कोल्हे यांच्यावर केलेल्या आरोपाला आमदार रोहित पवार यांनी प्रत्युत्तर दिले. अजित दादा डिस्टर्ब आहेत की नाही माहित नाही, मात्र या सर्व प्रकरणामुळे जनता डिस्टर्ब आहे. ते नीट करण्याचं काम आता सुरू असल्याचं रोहित पवार यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्यासोबत गेलेल्या आमदार भाजपच्या चिन्हावर निवडणुकीला सामोरे जावे लागते की काय? यासाठी चिंतेत आहेत. काही आमदार भाजपच्या चिन्हावर लढण्यास तयार नाही, तर काही आमदार तयार आहेत. त्यामुळे आता आगामी काळात म्हणले लोकसभा निवडणुकीनंतर हे आमदार शरद पवार यांच्यासोबत येण्याचा निर्णय घेतील, असा दावा देखील आमदार रोहित पवार यांनी केला आहे.आमदार निलेश लंके यांच्या पोस्टरवर शरद पवार यांचे फोटो दिसत आहेत. हळूहळू असे फोटो सर्वच आमदारांच्या पोस्टवर साहेबांचे फोटो दिसून येतील असा दावा रोहित पवार यांनी केला आहे. अमोल कोल्हे यांच्या माध्यमातून नीलेश लंके यांना मदत करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे नीलेश लंके साहेबांसोबत आले तर आश्चर्य वाटायला नको, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे. नीलेश लंके यांच्या लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारी बाबत काहीही बोलण्यास रोहित पवार यांनी टाळले. लोकसभा निवडणुकीत उमेदवारीचा निर्णय हा शरद पवार साहेब घेत असतात त्यामुळे मी काही सांगू शकत नसल्याचं रोहित पवार यांनी म्हटले आहे.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे चॅलेंज हे फक्त अजित पवार यांना नाही तर भारतीय जनता पक्षाला देखील आहे. भारतीय जनता पक्षाला चॅलेंज असल्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन वेळा महाराष्ट्रात येऊन गेले, तर अमित शहा देखील दौरा करत आहेत. त्यामुळे महाराष्ट्राची परिस्थिती भाजपला वाटते तेवढी सोपी नाही. त्यामुळेच दिल्लीतील नेते महाराष्ट्रावर लक्ष ठेवून आहेत. भाजपच्या कालच्या बैठकीला रासपला बोलवण्यात आले नव्हते. यावरूनच असे लक्षात येते की, पक्ष जोपर्यंत ताकदवान आहे, तोपर्यंत भाजप त्यांना बोलवते. पक्ष संपला की, भाजप त्यांना विचारत नाही असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. लोकांनाही भाजपची ही प्रवृत्ती आता कळली असल्याचं रोहित पवार यांना म्हटलं आहे

हर्षवर्धन पाटील हे भाजपमध्ये आहेत. असे असताना ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार यांच्या बाबत बोलत आहेत. सत्तेत असताना देखील एकनाथ शिंदे यांच्या गटातील दोन आमदार एकमेकात भिडत आहे. यांचे पक्षांतर्गत वाद मतदार पाहत आहेत. त्यामुळे हे वाद पाहता मतदार हे महाविकास आघाडीला मतदान करतील, असा विश्वास मला वाटत असल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

## प्रवीण कावटी यांचे निधन



**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक आनंदनगर पांडवार्ड येथील रहिवासी तथा वेकोली नागलोन येथील इलेक्ट्रिशन या पदावर कार्यरत कर्मचारी प्रवीण श्रीहरी कावटी यांचे दि.४ ला सायंकाळी ५:३० वाजता दरम्यान राहते घरी आकस्मिक निधन झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. मृत्यूसमयी ते ४२ वर्षाचे होते. आज दि. ५ ला दुपारी १२.२० वाजता मोक्षधाम स्मशानभूमीवर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार पार पडले .यावेळी वसंत सातभाई यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या शोकसभेत मोठ्या संख्येने आप्तेष्ट, नातेवाईक व वेकोली कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. मृतकाच्या पश्चात पत्नी, मुलगी, भाऊ, बहीण व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

## बालाजी पाटील यांचे निधन



**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

दिनांक ३ मार्च २०२४ रविवार ला श्री बालाजी देवाजी बोरकर (पाटिल) यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी वृध्दापकाळाने दुपारी तीन वाजता दु:खद निधन झाले त्यांच्या मागे एक मुलगा,सुन, चार मुली , नातवंडे,पणतू आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.ते गिरगाव येथील सर्वात वयोवृद्ध व्यक्ती होते. उद्या सकाळी दहा वाजता गिरगाव येथील हिंदू स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे

# नाशिक शहरातील भूसंपादन प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी–मंत्री छगन भुजबळ

**नाशिक**–नाशिक शहरातील बेकायदेशीरपणे केली जात असलेली भूसंपादन प्रक्रिया स्थगित करण्यात यावी. नाशिक शहरातील गंगापूर रोड भागातील अडीच एकर शैक्षणिक भूखंडावरील आरक्षण बेकायदेशीररित्या बदलले जात असल्याने या प्रक्रियेला स्थगिती देऊन सदर घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करावी. सेवाजेष्ठता डावलून बेकायदेशीरपणे केलेल्या बदल्यांची चौकशी करून सदर बदल्या रद्द करण्यात याव्यात अशी मागणी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, नाशिक महानगरपालिकेतील मागील भूसंपादन घोटाळ्याची चौकशी सुरू असताना आता जवळपास २०० कोटींच्या बेकायदेशीरपणे भूसंपादनाचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे या संदर्भातील ३०% रक्कम पाठवण्याची कार्यवाही सूरु आहे. सदर भूसंपादन करतांना उच्च न्यायालयाचे आदेश आहेत तसेच १२ टक्के मासिक व्याज दराने सुरू आहे असे कारण दिले जात आहे. मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील करणे गरजेचे आहे. यापूर्वीच्या अधिकाऱ्यांनी अपिल केले नाही. आता अपिलाची मुदत संपली असे कारण दिले जात आहे. मात्र महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय चुकीमुळे जर महापालिकेला आर्थिक फटका बसत असेल तर सर्व प्रकरण एकत्र करून सर्वोच्च न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये भूसंपादनासाठी रकमा पाठवल्या जाऊ नये अशी मागणी केली आहे.नाशिक महानगरपालिकेमध्ये मागील काळात मिसिंग लिंक भूसंपादन घोटाळा झालेला आहे. मिसिंग लिंक म्हणजे एखाद्या रस्त्याची दोन्ही बाजूने जागा संपादित झाली आहे मात्र मध्येच एखादा पॅच बाकी आहे अशा जागेचे भूसंपादन, मिसिंग लिंकची संपूर्ण यादी राज्य शासनाकडे मागवून शासनाच्या पुर्व मान्यतेनंतरच भूसंपादनाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. काही भूसंपादनांमध्ये जमीन मालकांनी आपले अधिकार अन्य व्यक्तीला दिलेले असतात. अशा प्रकरणांमध्ये मूळ मालकालाच मोबदला दिला जावा अशी तरतूद आहे. मात्र या तरतुदीकडे दुर्लक्ष केले जाते. विविध निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शासनाची बदनामी होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची आवश्यकता असल्याने नाशिक शहरातील बेकायदेशीरपणे केली जात असलेली भूसंपादन प्रक्रिया स्थगित करण्यात यावी अशी मागणी केली आहे.नाशिक शहरातील गंगापूर रोडवर भागातील चोपडा हॉस्पिटललगत सर्व्हे क्रमांक ७१७ या भूखंडावर शैक्षणिक आरक्षण आहे. या शैक्षणिक प्रयोजन व लोकहितासाठी अडीच एकर क्षेत्रफळ असलेल्या आरक्षित भूखंडावरील मूळ आरक्षण रद्द न करण्यासाठी हरकती मागवण्यात आल्या आहेत. ११९ कोटी रुपयांचा हा भूखंड असून मूळ शैक्षणिक आरक्षण हटवून त्यावर रहिवासी आरक्षण निश्चित केले जात आहे. मुळात ही जागा पुढील दहा वर्षासाठी महापालिकेच्या ताब्यात असणार आहे.त्या आधीच शैक्षणिक झोन रद्द करणे बेकायदेशीर असून त्यामुळे महानगरपालिकेचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान सुध्दा होणार आहे. जोपर्यंत ते आरक्षण व्यपगत होत नाही तोपर्यंत त्यावरील झोन वा त्याचे मूळ प्रयोजन बदलता येत नाही. मात्र काही लोकप्रतिनिधींनी केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने बेकायदेशीरपणे हे शैक्षणिक आरक्षण बदलले जात आहे. अशा पद्धतीने दहा वर्षाची मुदत संपण्यापूर्वी आरक्षण व त्याचे झोन बदलले जाऊ लागले तर चुकीचे पांयडे पडतील. तसेच महापालिकेचे मोक्याचे रिझर्वेशन हातातून जातील त्यामुळे सदर बेकायदेशीर आरक्षण बदलाला स्थगिती देऊन सदर घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.त्याचबरोबर नाशिक महानगर पालिकेत सेवाजेष्ठता डावलून बेकायदेशीरपणे बदल्या करण्यात आल्याबाबत तक्रार आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण करण्याचे काम विद्यापीठाच्या उपकेंद्रातून व्हावे-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये कौशल्य शिक्षणाला दिलेले प्राधान्य विचारात घेवून औद्योगिक क्षेत्राला आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण करण्याचे काम विद्यापीठाच्या उपकेंद्रातून व्हावे अशी अपेक्षा राज्याचे महसूल तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अहमदनगर येथील उपकेंद्राचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील दुरदृष्य प्रणालीव्दारे या कार्यक्रमात सहभागी झाले होते. खासदार डॉ.सुजय विखे पाटील, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा बॅंकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र विखे पाटील, कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, प्र.कुलगुरु डॉ.पराग काळकर यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात पालकमंत्री श्री विखे पाटील म्हणाले की, अहमदनगर येथे उपकेंद्र व्हावे यासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांना अनेक वर्षांनंतर यश आले. या केंद्रासाठी पुढाकार घेणा-या सर्वांचेच अभिनंदन करुन उपकेंद्र आता अहमदनगर येथे सुरु झाल्याने अधिकची जबाबदारी वाढली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने दिलेल्या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान आपल्या सर्वांपुढे आहे. त्यासाठी आता विद्यापीठांबरोबरच महाविद्यालयांनीही पुढाकार घेण्याचे त्यांनी आवाहन केले.आज शिक्षणाच्या परिभाषा सर्व बदलल्या आहेत.



एकाच वेळी अनेक विद्या शाखांचे ज्ञान संपादन करण्याची प्रक्रीया गतीने पुढे जात आहे. यामध्ये पुणे विद्यापीठालाही मागे राहुन चालणार नाही. कारण केवळ बी.ए, बी.कॉम सारख्या तत्सम पदव्या घेवून विद्यार्थी आता स्पर्धेत टिकू शकणार नाही. यासाठी या पदवी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना कौशल्य आणि तांत्रिक शिक्षणही कसे घेता येईल याचाही विचार व्हावा असे सूचित करुन पालकमंत्री श्री विखे पाटील म्हणाले की, अहमदनगर येथे सुरु झालेले उपकेंद्र हे कौशल्य शिक्षणाचे एक महत्वपूर्ण केंद्र ठरावे, यासाठी कौशल्य विकासाचे सर्व कोर्स येथे तातडीने सुरु करुन विद्यार्थ्यांना संधी देण्याची व्यवस्था निर्माण करावी.विद्यापीठाने आता आपली व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे. कारण यापुर्वी विद्यापीठं एका चाकोरीमध्ये अडकली गेली. ए.आय.सी.टी, यु.जी.सी यांसारख्या कमिट्यांच्या मार्गदर्शक सुचनांमुळे आजपर्यंत संस्था कार्यरत राहील्या. परंतू आता या कमिट्यांचेच योगदान काय? असा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे असे स्पष्ट करून, याबाबत आता केव्हा तरी प्रधानमंत्र्यांसोबत आपण बोलणार असून जिल्ह्यांमध्ये असलेल्या शैक्षणिक संस्थाची संख्या लक्षात घेवून प्रत्येक जिल्ह्यात आता स्वतंत्र विद्यापीठ निर्माण करण्याची मागणीही त्यांनी आपल्या भाषणात केली.शिक्षण व्यवस्थेमध्ये कोचिंग क्लासचा वाढलेला हस्तक्षेप हे व्यवस्थेच अपयश आहे. या कोचिंग क्लासवर आपण कुठलेही नियंत्रण आणू शकलो नाही. महाविद्यालयात येणारा विद्यार्थी या कोचिंग क्लासकडे का वळाला याचे आत्मपरिक्षण करण्याची गरज श्री विखे पाटील यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.विद्यापीठाच्या विस्तारासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून ५ कोटी रुपयांचा निधी तसेच ई-बस उपलब्ध करुन देण्याची केलेली मागणी पालकमंत्री विखे पाटील यांनी मान्य करुन या उपकेंद्राकडे येणा-या रस्त्याचे रुंदीकरण व विद्युतीकरणासाठी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांनी उपकेंद्राच्या इमारतीची निर्मिती ही स्व.दादा पाटील शेळके यांची स्वप्नपुर्ती असून २५ वर्षे न सुटलेला प्रश्न हा मागील दोन वर्षात मार्गी लागला. या उपकेंद्राच्या इमारतीमुळे गावाचे अन्य प्रश्नही सोडविण्याची ग्वाही त्यांनी दिली. याप्रसंगी कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, डॉ.राजेंद्र विखे पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सिनेट सदस्य सचिन गोर्डे यांनी केले.

## ‘मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळे’त चिंचणी जि.प.शाळेचा तिसरा क्रमांक

**सोलापूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा’ अभियानात सोलापूरसह राज्यभरातील जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका व खासगी अशा एक लाखांहून अधिक शाळांनी सहभाग नोंदवला होता. सोलापूर जिल्हा परिषदेच्या चिंचणी (ता. पंढरपूर) येथील शाळेने पुणे विभागात तिसरा क्रमांक पटकावला आहे. तर खासगी शाळांमधून निंबर्गी येथील श्री बसवेश्वर हायस्कूल विभागात दुसरा क्रमांक पटकावला. मंगळवारी (ता. ५) मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या शाळांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.शाळांमधील भौतिक सोयी-सुविधा, गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम, विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता, स्वच्छता अशा विविध बाबींच्या आधारावर राज्यातील सर्वोत्कृष्ट ६६ शाळांची निवड या अभियानातून करण्यात आली आहे. पंढरपूर तालुक्यातील पर्यावरणपूरक चिंचणी गावाची ओळख राज्यभर आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी देखील जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच या गावात पहिल्यांदाच सर्वसाधारण सभा घेतली होती. तत्पूर्वी, त्यांनी चिंचणीतील जिल्हा परिषदेच्या शाळेला देखील भेट दिली होती. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधील मुलांप्रमाणेच तेथील विद्यार्थी इंग्रजी, अंकगणितात अव्वल असल्याचे दिसून आले होते.या शाळेला आता ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानाअंतर्गत पुणे विभागात तिसरा क्रमांक मिळाला आहे. खासगी शाळांमधून दक्षिण सोलापुरातील निंबर्गी येथील श्री बसवेश्वर विद्यालयाने विभागात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्या उपस्थितीत या शाळांचा गौरव होणार आहे.सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७८८ शाळा असून महापालिकेच्याही जवळपास ५८ शाळा आहेत. ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ अभियानात जिल्ह्यातील बहुतेक शाळांचा सहभाग होता. पण, राज्यस्तरावर जिल्ह्यातील एकही शाळा निवडली गेली नाही. विभागीय स्तरावर सोलापूर जिल्हा परिषदेच्या एकाच शाळेची निवड झाली आहे. महापालिकेची एकही शाळा ना राज्य ना विभागीय स्तरावर पोचली. या अभियानामुळे शासकीय व खासगी अनुदानित शाळांच्या गुणवत्तेबद्दल प्रश्न उपस्थित होत आहेत. राज्यभरात अशीच स्थिती असल्याचे समोर आले आहे.

## रोटरी क्लब सांगोला यांचा व्यवसाय सेवा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**

रोटरी क्लब सांगोला यांच्या वतीने पाच व्यक्तींना दिनांक ३ मार्च रोजी व्यवसाय सेवा पुरस्कार देण्यात आले. व्यवसाय सेवा पुरस्कार प्राप्त व्यक्तींमध्ये श्री एस एम सिंग,स्टेशन मास्तर सांगोला यांचा समावेश करण्यात आला. यांचा परिचय रो. हमीद शेख यांनी करून दिला. सांगोला स्टेशन परिसरात स्वच्छता, वृक्षारोपण लक्ष वेधून घेते. कामाची वेगळी आवडच माणसाला असावी लागते.काम दोन प्रकारचे असतं एक व्यवसाय म्हणून आणि एक सेवा म्हणून तर सेवा म्हणूनच काम अत्यंत श्रेष्ठ आहे ते या स्टेशन मास्तर यांनी केलेले आहे.

पुरस्कार प्राप्त श्री नितीन भोसले हे त्यांच्या वडिलांच्या संस्काराप्रमाणे आजही काम करत आहेत. यांची ओळख रो. महेश गवळी यांनी करून दिली. भोसले यांचे वडील केस कापण्यासाठी येणाऱ्या पहिल्या गिऱ्हाईकाचे पैसे समाजसेवेसाठी खर्च करत असत. नितीन भोसले हे शिक्षक आहेत तरी ते त्यांच्या मोकळ्या वेळात व जादाच्या वेळेत केस कापण्याचे काम करतात आणि त्यातून मिळणारे सर्वच्या सर्व उत्पन्न आपल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करतात. पुरस्कार प्राप्त श्री .संजय दिघे हे विषमुक्त शेतीसाठी वाढेगाव परिसरात प्रसिद्ध आहेत. यांची ओळख रो. वैजनाथ घोंगडे यांनी करून दिली. आजपर्यंत हजारो शेतकऱ्यांना त्यांनी विषमुक्त शेती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केलेले आहे. बाजारात मिळणारे तेल भेसळयुक्त आहे म्हणून शुद्ध तेलासाठी त्यांनी लाकडी घाण्याची सुद्धा सोय उपलब्ध करून दिलेली आहे. मुलांच्या वाढदिवसाला ते गोरगरीब मुलांना सायकल भेट देतात. अनाथ आश्रम, वृद्धाश्रम अशा ठिकाणी नेहमीच मदत करतात. रोटरी क्लब सभासदांसाठी स्वस्त दरात तेल काढून देण्याची ऑफर सुद्धा त्यांनी जाहीर केली. पुरस्कार प्राप्त श्री.दत्तात्रय दहिवाडकर यांचे वडील कोर्टामध्ये पाणी भरण्याचे काम करत होते. कोर्टामध्ये सेवा देण्याचे काम दहिवाडकर यांनी सुद्धा सोडलेले नाही. दत्तात्रय दहिवाडकर यांनी कोर्टामध्ये स्वतःचे कॅन्टीन सुरू केले आहे आणि ते अत्यंत प्रेमळपणे सर्वांना चहा देतात. त्यांचा परिचय देताना ड.सचिन पाटकुलकर म्हणाले की, कोर्टाचा मूड तयार करण्याचे काम दहिवाडकर करतात. यांचा सकाळचा चहा कोर्टाचा मूड बदलतो. पुरस्कार प्राप्त बापूसाहेब भाकरे यांचा परिचय रो विलास बिले यांनी करून दिला.भाकरे कुटुंबीय हे सांगोल्यामध्ये समाजसेवेसाठी सर्वश्रुत आहे. बापूसाहेब हे सर्व थरातल्या लोकांना समाजसेवेसाठी सुपरीचीत आहेत. बापूसाहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केलेली मदत कधीही सांगत बसत नाहीत. दिलेले दान हे उजव्या हाताचे डाव्या हाताला कळू नये म्हणतात अशी त्यांच्या कामाची पद्धत आहे. सद्या राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे काम पूर्णत्वाकडे जात आहे, त्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.अशा पाच व्यक्तींना व्यवसाय सेवा पुरस्काराने रोटरी क्लबच्या वतीने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अध्यक्ष डॉ.साजिकराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. रो विकास देशपांडे यांनी व्यवसाय सेवा पुरस्काराबद्दलची माहिती दिली. व्यवसाय सेवा पुरस्कार या विभागाचे रोटरी मधील प्रमुख रो.संतोष गुळमिरे यांनी कार्यक्रमाची खर्चासह जबाबदारी घेतली.

## ब्राम्हण ऐक्य परिषदेच्या आयोजकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घ्या-ब्राह्मण समाजाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जिंतूर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे दि. २५ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या ब्राह्मण ऐक्य परिषदेचे आयोजक व स्वागताध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्यावर दाखल करण्यात आले होते. सदरील गुन्हा मागे घेण्यासाठी जिंतूर सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने दि.०४ मार्च सोमवार रोजी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान सदर निवेदनात बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे दि.२५ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बाहह्मण ऐक्य परिषदेचे आयोजक व स्वागताध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्यावर दाखल करण्यात आलेला गुन्हा हे अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हटले आहे. संयोजक बाजीराव धर्माधिकारी यांच्यावर जाणीवपूर्वक व नाहक दाखल केलेला गुन्हा तात्काळ मागे घ्यावा अशी आग्रही मागणी सकल ब्राह्मण समाज जिंतूर च्या वतीने करण्यात आली आहे. सदर निवेदनात कोणत्याही समाजाचे संमेलन व परिषद असेल तर त्या व्यासपीठावरून साधक बादक अशा मुद्द्यावर स्वतःची मते मांडली जाणारच हे नैसर्गिक आहे परंतु शेवटी सर्व संमतीने कोणते ठराव मांडले गेले व मंजूर केले यावरून त्या संमेलन अथवा परिषदेची समग्र भूमिका ठरवली जाते. संमेलनात कोण काय मत



व्यक्त करतो कोणाची काय व्यक्तिगत मध्ये असतात हे केवळ विचार मंथन ची प्रक्रिया असते. या संपूर्ण संमेलनात कोण ना एकाने मांडलेली भूमिका किंवा मध्ये संपूर्ण समाजाची भूमिका असते असे निश्चित नसते. या परिषदेत संपूर्ण मतांतरानंतर संमत केलेले ठराव ही खऱ्या अर्थाने त्या परिषदेची किंवा संमेलनाची पर्यायाने समाजाची एक मुखी भूमिका असते. परळीत झालेल्या ब्राह्मण एकके परिषदे त कोणाचाही विरोध करणारा किंवा अन्यथा कोणत्याही समाजाच्या न्याय हक्कातवर गदा येईल असा कोणताही ठराव मंजूर झाला नाही. केवळ ब्राह्मण समाज व त्या समाजाला सातत्याने भेडसावणाऱ्या व भारताच्या नागरिकाला मिळालेल्या घटनादत्त अधिकाराच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून भूमिका घेण्यात आली असल्याचे म्हटले आहे. आयोजक म्हणून बाजीराव धर्माधिकारी यांच्यावरील नाहक दाखल केलेला गुन्हा मागे घ्यावा. अशी जिंतूर सकल ब्राह्मण समाजाकडून मागणी करण्यात आली आहे. यावेळी मोठ्या संख्येने सकल ब्राह्मण समाज नागरिक उपस्थित होते.

## पंतप्रधान मोदींचे स्वागत करण्याची संधी म्हणजे आयुष्यातील सुवर्णक्षण

**नांदेड । प्रतिनिधी**

तेलंगणातील आदिलाबादहून विमानाने चेन्नईकडे जात असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काही मिनिटांसाठी नांदेड विमानतळावर उतरले होते.त्यावेळी त्यांचे स्वागत करण्याची संधी भारतीय जनता पक्षाने माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला दिल्यामुळे माझ्या आयुष्यातील हा सुवर्णक्षण म्हणून कायमचा नोंदवला गेला अशा शब्दांमध्ये नांदेड पंचायत समितीचे माजी उपसभापती सुनील राणे यांनी भावना व्यक्त केल्या.नांदेड विमानतळावर पंतप्रधान मोदी यांचे स्वागत करण्यासाठी पक्षाची दिग्गज मंडळी उपस्थित होती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तेलंगणातील आदीलाबाद येथील एका सार्वजनिक सभेसाठी आज सकाळी नागपूर येथून हेलिकॉप्टरने उपस्थित झाले होते. त्याच हेलिकॉप्टरने ते नांदेड विमानतळावर आले. नांदेडवरून विशेष विमानाने ते चेन्नईकडे रवाना झाले.विमानतळावर राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, खा. हेमंत पाटील, खा.डॉ.अजित गोपछडे, आ. रामपाटील रातोळीकर,आ. तुषार राठोड,आ. राजेश पवार, आ.श्यामसुंदर शिंदे, आ. बालाजी कल्याणकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांच्यासह भाजपाचे अनेक नेते उपस्थित त्यामध्ये सुनील राणे यांचाही समावेश होता.नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक शशिकांत महावरकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय



श्री नरेंद्र मोदी जी यांचे नांदेड विमानतळ येथे स्वागत करण्याचा माझ्या जीवनातील अविस्मरणीय क्षण आहे. मला भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता असल्याचा सार्थ अभिमान आहे.भारतीय जनता पक्षच सामान्य कार्यकर्त्यांला देशाच्या पंतप्रधानांना भेटण्याची संधी देऊ शकतो.आज बुथवर काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांलाही मोदीजींनी भेटून विचारपूस केली. ही बाब खरोखरच सामान्य मतदारासाठी व कार्यकर्त्यांसाठी गौरवाची बाब आहे. यामुळे सामान्य कार्यकर्त्यांना पक्षासाठी व देशासाठी कार्य करण्याची प्रेरणा व सकारात्मक ऊर्जा मिळते. देशाचा पंतप्रधान सर्वसामान्य कार्यकर्त्यांची विचारपूस करतो हे चित्र यापूर्वी कधी पाहायला मिळाले नव्हते. यामुळे आजचा दिवस माझ्यासाठी खूप महत्त्वाचा व भाग्याचा आहे. हा दिवस मी माझ्या आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही. अशा शब्दांमध्ये त्यांनी देशाच्या पंतप्रधानांचा गौरव केला.

## उदगीर शहरात ८ मार्च ते १२ मार्च दरम्यान कुस्तीचे ‘महादंगल’

# स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे उदगीरच्या ऐतिहासिक नगरीत आयोजन-ना.संजय बनसोडे

**उदगीर** -उदगीर महाराष्ट्राच्या क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ होण्यासाठी विविध खेळांच्या माध्यमातून युवा पिढीला खेळाकडे आकर्षित करुन त्यांच्यातील क्रीडा गुणांना वाव देण्याच्या हेतूने आपण विविध क्रीडा स्पर्धा घेत आहोत. महाराष्ट्रात कुस्तीसारख्या देशी खेळाबाबत ग्रामीण व शहरी भागात विशेष आवड व आत्मियता आहे. कुस्ती हा खेळ महाराष्ट्रात सर्वत्र खेळला जातो. देशातील इतर राज्यात व देशाबाहेरही कुस्ती खेळाचा प्रचार व प्रसार करण्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. राज्याची कुस्ती खेळातील कामगिरी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत उल्लेखनीय आहे.

या स्पर्धेमध्ये राज्यातील ३६० खेळाडू व संघ व्यवस्थापक सहभागी होणार आहेत. यामध्ये फ्रीस्टाईल १० संघ, ग्रीको रोमन १० संघ व मुलीचे १० संघ असे एकूण ३० संघ सहभागी होणार असून, प्रत्येक संघात दहा वजनगटातील १० खेळाडू तसेच प्रत्येक संघासोबत एक संघ व्यवस्थापक व एक मार्गदर्शक असा १२ जणांचा संघ सहभागी असणार आहेत. राज्यातील खेळाडूंना क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होण्याची




संधी मिळवून देण्यासाठी, ऑलिम्पिक पदक विजेते स्व. खाशाबा जाधव यांच्या कामगिरीचा गौरव करण्यासाठी, त्यांच्या नावाने स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन दरवर्षी करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला असुन आपल्या उदगीर शहरात येत्या ८ ते १२ मार्च दरम्यान 'महादंगल' कुस्ती स्पर्धेचे आयोजन आपण केले असल्याची माहीती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली.ते उदगीर शहरातील नवीन शासकीय विश्रामगृह येथे आयोजीत पत्रकार परिषदेतऑलिंपिकवीर स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धाबाबत माहिती देताना बोलत होते.या पत्रकार परिषदेस उपसंचालक युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. अस्लम काझी, पो.नि. करण सोनकवडे, पो.नि. अरविंद पवार, तालुका क्रीडा अधिकारी चंद्रकांत लोदगेकर, आदी उपस्थित होते.पुढे बोलताना ना.बनसोडे यांनी, या कुस्ती स्पर्धा मॅटवर होणार असुन दि. ९ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता या कुस्ती स्पर्धेचे मोठ्या थाटात उद्घाटन होणार आहे. मागील काळात विविध स्पर्धांचे आयोजन करुन खेळाडुंच्या पाठीशी आपण भक्कमपणे उभा असल्याची ग्वाही देवुन गेल्या ७ महिन्यात खेळाडुंचे हिताचे अनेक निर्णय घेतले असुन येत्या काळात मिशन लक्षवेध योजना राबवणार आहे. गेल्या ३ वर्षापासुन रखडलेल्या शिवछत्रपती पुरस्काराचे वितरण आपण मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे केले तर आशियाई क्रीडा व गोवा येथील स्पर्धेत आपल्या खेळाडुंनी नेत्रदीपक कामगिरी केली आहे. पुणे शहरात तब्बल ७५ कोटीचे ऑलम्पिक भवन उभारण्याचे काम चालु आहे तर पुणे शहरात अंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ तर संभाजीनगर येथे क्रीडापीठ आपण करत आहोत. यामुळे आता आपल्या भागात आंतरराष्ट्रीय खेळाडु घडण्यास मदत होईल असेही ना.संजय बनसोडे यांनी सांगितले.

# शौचालय लाभार्थ्यांना सात दिवसात अनुदान द्या-उपसरपंच अशोक चौधरी यांची मागणी

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर ग्रामपंचायत मध्ये गेल्या चार वर्षापासून स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत शौचालयाचे बांधकामे पूर्ण होऊन सुद्धा पंचायत समितीकडून लाभार्थ्यांना वारंवार मागणी करूनही अनुदान दिल्या गेले नाही. त्यामुळे उपसरपंच अशोक चौधरी यांनी निवेदन देऊन सात दिवसाच्या आत अनुदान देण्यात यावे, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

शंकरपूर ग्रामपंचायत अंतर्गत १२४ शौचालय स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंजूर करण्यात आले व लाभार्थ्यांनी त्याची बांधकाम सुद्धा केलेली आहे. परंतु गणेश रामटेके समूह समन्वय पंचायत समिती चिमूर यांनी सन २१, २२, २३, २४ या चार वर्षांमध्ये शंकरपूर मध्ये येऊन कोणतीही चौकशी केलेली नाही. तरीही काही मर्जी मधल्या लाभार्थ्यांना चौकशी न करता किंवा शौचालय बांधकाम झाल्याचे प्रमाणपत्र शंकरपूर ग्रामपंचायत कडून न घेता काही देवाण-घेवाण करून अनुदान काढून दिले




व उर्वरित जास्तीत जास्त लाभार्थ्यांना अजूनही ताटकळत ठेवून अन्याय केलेला आहे. त्यामुळे समूह समन्वयक गणेश रामटेके यांनी ग्रामपंचायत इकडून कोणते ही प्रमाणपत्र न घेता मर्जीतल्या लाभार्थ्यांना बेकायदेशीरपणे अनुदान काढून दिल्याने व बाकी लाभार्थ्यांना त्रास दिल्या प्रकरणी त्यांचे वर कारवाई करण्यात यावी, व येत्या सात दिवसात उर्वरित लाभार्थ्यांच्या शौचालयाची चौकशी करून त्यांना त्वरित अनुदान देण्यात यावे, अन्यथा पंचायत समिती चिमूर येथे आंदोलन करण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे शंकरपूर ग्रामपंचायतचे उपसरपंच अशोक चौधरी तसेच ग्रामपंचायत सदस्य निखिल गायकवाड यांनी गटविकास अधिकारी चिमूर यांना दिला आहे.

> “ एकूण १२४ लाभार्थ्यांपैकी दहा लाभार्थ्यांचे कागदपत्राची पूर्तता झाल्याने व ग्रामपंचायतीने रीतसर प्रमाणपत्र दिल्याने त्यांना अनुदान देण्यात आले. व काही लाभार्थी अपात्र ठरलेत आणि उर्वरित लाभार्थ्यांनी मी तीनदा शंकरपूर येथे जाऊन सुद्धा कागदपत्राची पूर्तता न केल्यामुळे व निधी नसल्यामुळे हे लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. परंतु पंचायत समिती ला या योजनेचा निधी उपलब्ध झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येईल.
>
> **समूह समन्वय गणेश रामटेके**

# ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार आरोग्य सेवा समिती तर्फे रुग्णांची ४३ वी तुकडी शस्त्रक्रियेसाठी रवाना




**घुग्घुस । प्रतिनिधी**

शहरातील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आरोग्य सेवा या समिती महाराष्ट्रतर्फे रुग्णांची ४३ वी तुकडी विविध आजरांवर शस्त्रक्रियेसाठी मंगळवार, ५ मार्च रोजी सकाळी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रातून सेवाग्रामला भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात व भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या नेतृत्वात रवाना करण्यात आली.

याप्रसंगी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे म्हणाल्या, ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आरोग्यसेवा समितीच्या माध्यमातून घुग्घुस व परिसरातील रुग्णांना विविध आजारांवर शस्त्रक्रियेसाठी सेवाग्रामला पाठविण्यात येत आहे.विविध प्रकारचे आजार ज्या रुग्णांना झाले आहे, त्या सर्वांची शस्त्रक्रिया मोफत ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आरोग्यसेवा समिती महाराष्ट्र ही करत आहे. आज ६४ रुग्णांना पाठविण्यात आले असून, मागील अनेक वर्षांपासून ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार आरोग्यसेवा समितीच्या माध्यमातून रुग्ण सेवेचे कार्य निरंतर सुरु आहे. रुग्णांनी शस्त्रक्रियेसाठी ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन केले.यावेळी प्रयास सखी मंच घुग्घुसच्या अध्यक्षा किरण बोढे, माजी सरपंच संतोष नुने, अजय लेंडे, सुनंदा लिहीतकर, सचिन पाझारे, संदीप तेलंग, राकेश फुलझले, विजय बावणे आदी उपस्थित होते.

# सिद्धिबागेत महाशिवरात्र महोत्सवास प्रारंभ

**अहमदनगर । प्रतिनिधी**

श्री सिध्देश्वर महादेव मंदिर ट्रस्ट, सिध्दीबाग, अहमदनगर.आयोजित महाशिवरात्री महोत्सब सोहळ्या निमित्त अखंड हरिनाम सप्ताह तसेच ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी व ग्रंथराज व श्री शिवलिलामृत ग्रंथ सामुदायिक पारायण सोहळा दि.२ ते ९ मार्च पर्यंत साजरा होत आहे.सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील थोर नामवंत विद्वान कीर्तनकार, प्रवचनकार यांना निमंत्रीत केले आहे.तसेच महिला भजनी मंडळाची भजने दररोज होतील.भारुडाचे कार्यक्रम होतील, तरी सर्व भाविकांनी श्रवणाचा लाभ घ्यावा, श्री सिध्देश्वर महादेव मंदिर ट्रस्ट द्वारा अखंड प्रवचन सायंकाळी ७ ते ८ सेवा चालु आहे.

सप्ताहाचे नेतृत्व भागवत महाराज दळवी व पारायण नेतृत्व शोभाताई मुळे महाराज करणार आहेत तसेच दैनंदिन कार्यक्रम पुढील प्रमाणे पहाटे ४ ते ६ काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम प्रार्थना,सकाळी ७ ते ७.३० आरती,मंडळाची आरती,सकाळी ७.३० ते ११ श्री ज्ञानेश्वरी पारायण,दुपारी ११ ते १ तुकाराम महाराज गाथा भजन,दुपारी १ ते २ श्री. शिवलिलामृत पारायण, दुपारी २ ते ४ महिला मंडळाचे भजन,दुपारी ४ ते ६ प्रवचन,५



ते ६ हरिपाठ,रात्री ९ वा कीर्तन होत आहे श्री. हरीहरेश्वर महिला मंडळ,श्री. मार्कंडेय महिला मंडळ,बाळाजी महिला मंडळ,श्री.पंचमुखी महिला मंडळ,श्री.पर्जन्येश्वर महिला मंडळ,श्री.कांबळे भजनी मंडळ यांचे भजने होणार आहेत तर रात्री निळकंठ महाराज देशमुख यांचे पसायदानावर प्रवचने होतील तर महाशिवरात्रीच्या दिवशी मिराबाई महाराज काशिद यांचे प्रवचन होईल तसेच दररोज सुभाष महाराज वाघुले, स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी, योग बेदान्त आश्रम, पांडुरंग महाराज शिंदे,आळंदी, महंत विवेकानंद भारती, अश्वलिंग संस्थान, बाबुराव महाराज वाघ,पंढरपुर, मारुती महाराज तुनतुने, पंढरपुर,.डॉ.जाधव गुरूजी महाराजदादेगांव यांची रात्री प्रवचने होणार आहेत त्यास नित्य सहकार्य हेमंत महाराज झेंडे यांचे आहे शनिवार ९ मार्चला भागवत महाराज दळवी नगर यांचे स.९ ते ११ काल्याचे किर्तन होईल, व उत्सवाची सांगता होईल.ज्यांना धन धान्य रुपाने या ज्ञान यज्ञाला सहकार्य करावयाचे असेल व वर्गणी द्यायची असेल त्यांनी मंदिरात संपर्क साधावा तसेच सर्व भाविकांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन श्री सिध्देश्वर महादेव मंदिर ट्रस्ट,सिध्दीबाग यांच्या वतीने करण्यात आले आहे .

## कायमस्वरूपी उपविभागीय अधिकाऱ्याची नियुक्ती करून

# जात प्रमाणपत्रे त्वरित वाटप करा-ॲड.नारायण गोले पाटील

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयात माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील मराठा समाजासह सर्वच जातीतील विद्यार्थी व नागरिक यांचे जात प्रमाणपत्र माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी नसल्यामुळे गेल्या दोन ते अडीच महिन्यापासून प्रलंबित असून अनेक विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रा शिवाय स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज दाखल करण्यास अनंत अडचणी निर्माण होत असल्याने, तसेच जात प्रमाणपत्रा अभावी स्पर्धा परीक्षा व इतर नोकरीतील निवड न होण्याची भीती वाटत असल्याने विद्यार्थ्या सह नागरिक उपविभागीय अधिकारी कार्यालयाला खेटे मारत असून उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा पदभार असलेल्या तहसीलदार यांना कामाचा व्याप जास्तीचा झाल्याने हजारो विद्यार्थी व नागरिक सात प्रमाणपत्रा पासून वंचित असल्यामुळे



शासनाने उपविभागीय अधिकारी कार्यालयाला कायमस्वरूपी अधिकारी नेमून हजारो जात प्रमाणपत्र धारकांना तात्काळ जात प्रमाणपत्रे अदा करावीत अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांच्यासह श्रीराम शेवाळे, सतीशराव रिंगणे, मुंजा पांचाळ, राहुल सोळंके, साळुजी हांडे,विष्णू शेळके, अशोक कुलकर्णी, सतीश शेजुळ, आनंत चव्हाण, गणेश चव्हाण, कडाजी नावडकर, सुशील हांडे, चांगदेव शेजुळ आदींनी दिला आहे.

# समृध्दी महामार्गावर अपघात टाळण्यासाठी चालकांनी नियमांचे पालन करावे- छगन भुजबळ

**नाशिक । प्रतिनिधी**

समृध्दी महामार्ग हा अतिशय सुंदर प्रकल्प निर्माण झाला आहे. या रस्त्यावरून चालताना चालक संमोहित होत असतात त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना चालकांनी नियमांचे पालन करावे असे आवाहन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.आज इगतपुरी येथे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या तिसऱ्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली व केंद्रीय राज्य मंत्री डॉ.भारती पवार, उपस्थितीत आणि मंत्री दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी आमदार हिरामन खोसकर, माजी आमदार शिवराम झोले, पांडुरंग गांगड, काशिनाथ मेंगाळ, व्यवस्थापकीय संचालक डॉ.अनिलकुमार गायकवाड, सहव्यवस्थापकीय संचालक मनोज जिंदाल, कैलास जाधव, श्री.कैलास पाटील, अजय बोरस्ते, गोरख बोडके, सुनील बच्छाव, प्रवीण तिदमे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी मंत्री छगन भुजबळ म्हणाले की, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे मुंबईतील



जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ते नागपूर स्थित मिहान यांना जोडणाऱ्या या महामार्गामुळे बंदरावरून जलद वाहतूक करून आवश्यक माल भारतभर वेळेवर पोहचवणे शक्य होणार आहे.हा प्रकल्प देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणुकीच्या आधारे राज्यातल्या ग्रामीण भागास महत्वाचा ठरलेला आहे.इगतपुरी इंटरचेंजचा वापर करुन ठाणे, मुंबई परिसरातुन शिर्डी येथे जाणा-या भाविकांचा प्रवास सुलभ व जलद होईल व १ तासात शिर्डीला पोहचता येईल.याशिवाय शिर्डी, अहमदनगर व नाशिक जिल्हयातील सिन्नर व इगतपुरी परिसरातील शेतक-यांच्या शेतीमालाच्या वाहतुकीसाठी मुंबई महानगर प्रदेशात येणे व जाण्यासाठी कमी कालावधी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी ते म्हणाले की, पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या एकात्मिक नियोजन आणि पायाभूत सुविधा कनेक्टीव्हिटी प्रकल्पांच्या एकत्रित अंमलबजावणीचे समर्थन करणारा हा महामार्ग दिल्ली मुंबई द्रुतगती मार्ग, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट आणि शिर्डी, अजिंठा, वेरूळ लेणी, लोणार सरोवर आणि इतर पर्यटन स्थळांना जोडणारा आहे. तसेच समृध्दी महामार्गामुळे कृषी, पर्यटन, दळणवळण, उद्योग इ. क्षेत्रे विकसित होऊन मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच इंधनाची आणि वेळेची बचत होणार आहे. समृध्दी महामार्गामुळे पर्यावरणाचे संतुलनासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणेत येत आहे, १८ कृषी समृद्धी केंद्रे उभारणेचे प्रस्तावित आहे. महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस-अजित पवार सरकारकडून पायाभूत सुविधा प्रकल्पांना मानवी चेहरा दिला जात असून विविध क्षेत्रात मुलगामी परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशाचे ग्रोथ इंजिन असणाऱ्या महाराष्ट्रासाठी हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग ही खऱ्या अर्थाने समृद्धीची भाग्यरेषा ठरेल असे त्यांनी सांगितले.

> **नाशिक मुंबई रस्त्याच्या चौपदरी काँक्रीटीकरण काम सुरू करण्यास प्राधान्य द्यावे**
>
> नाशिक मुंबई रस्त्याचे विस्तारीकरण व सहापदरी काँक्रीटीकरण करण्याची केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घोषणा केली आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात यावे. तसेच भिवंडी बायपास रस्त्याचे काम लवकरात पूर्ण करण्यात यावे अशी मागणी त्यांनी सार्वजनिक मंत्र्यांकडे केली.

# व्यंकटेश्वरा को-ऑपरेटिव्ह पॉवर अँड ॲग्रो प्रोसेसिंग लिमिटेड काजू फॅक्टरीचा उद्घाटन सोहळा

**कोल्हापूर**-आज बेळगाव येथे वेंकटेश्वरा को-ऑपरेटिव्ह पॉवर ॲग्रो प्रोसेसिंग लिमिटेड काजू फॅक्टरी चा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात व बहुसंख्येने उपस्थित असलेल्या माजी सैनिक व शेतकरी बांधव यांच्या साक्षीने सोहळा पार पडला. कर्नाटकच्या बालकल्याण मंत्री लक्ष्मी ताई हेंबाळकर यांच्या हस्ते दीप प्रजनन करून व आचार्य १००८ महामंडलेश्वर स्वामी संविधान सरस्वती महाराज यांच्या हस्ते प्रथम उद्घाटन जाहले. कोल्हापूर ,बेळगाव जिल्ह्यातून निवृत्त सैनिक यल्लाप्पा झांगरूजी ,पांडे साहेब ,वाघ साहेब , पाटील साहेब ,विनोद गंभीर, शंकर कडलगे, मारुती खोत, सदाशिव चौगुले, गजेंद्र मांगले ,सुनिता कडलगे पूजा गंभीर ,बीजी पाटील, शिवाजीराव चव्हाण, उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन शिवाजी डोळे तसेच त्यांच्या पत्नी उपस्थित होत्या .बेळगाव नगरीमध्ये आमच्या संस्थेचा हा पहिलाच प्रोजेक्ट काजू प्रोसेसिंग फॅक्टरी चा आहे. महाराष्ट्रातील चंदगड आजरा तालुक्यातील कच्चा माल काजू ,बेळगाव जिल्ह्यातील काही तालुक्यातील काजू आम्ही येथील स्थानिक शेतकऱ्यांच्याकडून खरेदी करून. त्या मालावर प्रोसेसिंग करून. स्वच्छ निवडक तयार झालेला . काजू परदेशात एक्सपोर्ट करणार आहोत. इथल्या शेतकऱ्यांना त्यांच्या कच्च्या मालाचा मोबदला योग्य व भरीव रक्कम स्वरूपात दिला जाईल असे चेअरमन शिवाजी डोळे .यांनी व्यक्त केले. आणि फॅक्टरी उभारणीसाठी देश सेवा करून आलेल्या सैनिकांचे व येथील शेतकऱ्यांचे मोठे योगदान मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले. व त्या परिवारांचा मी आदर व सन्मान करत आहे. असेच योगदान शेतकरी व सैनिक यांच्याकडून अजूनही मिळत राहो कर्नाटक, महाराष्ट्र राज्य मधून सर्वच परिवारातील सदस्यांकडून या शुभकार्यासाठी योगदान मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करून या उद्योगासाठी मला व आमच्या परिवाराला मदत व्हावी असे व्यक्त केले. या उद्घाटन सोहळ्यासाठी मालेगाव ,पुणे, मुंबई ,सोलापूर ,गदग ,निपाणी, सावंतवाडी, सिंधुदुर्ग या भागातील शेतकरी व माजी सैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.






# ताडाळी एमआयडीसीमध्ये प्रगत काष्ठ प्रक्रिया व सुविधा केंद्राचे भूमिपूजन

## चंद्रपूरचे काष्ठ देशात सर्वोत्तम-वनमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

'वन से धन' तक जाण्यासाठी वनक्षेत्रात मोठी शक्ती आहे. अयोध्येतील प्रभू रामचंद्राच्या मंदिरासाठी चंद्रपूरचे काष्ठ पाठविण्यात आले आहे. भविष्यातील १००० वर्षाचा विचार करून अयोध्येतील राममंदिर बांधण्यात आले आहे. त्यामुळे या मंदिरासाठी पाठवलेले काष्ठ हे १००० वर्ष टिकू शकते, असे संशोधनात सिद्ध झाले आहे, असे राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

ताडाळी एम.आय.डी.सी. येथे प्रगत काष्ठ प्रक्रिया व सुविधा केंद्राचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी बांबू विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विकास गुप्ता, जिल्हाधिकारी विनय गौडा, बांबू विकास महामंडळाचे क्षेत्रीय व्यवस्थापक सुमित कुमार, श्रीनिवास राव, संजीव रॉय, वनविभागाचे उपसंचालक नंदकिशोर काळे, वन अधिकारी प्रशांत खाडे, पर्यटन विकास महामंडळाचे प्रकाश धारणे आदी उपस्थित होते.चंद्रपूरचे काष्ठ हे केवळ देशातच नव्हे तर जगात सर्वोत्कृष्ट आहे, असे सांगून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, बांबू विकास महामंडळाच्या माध्यमातून अयोध्येचे राम मंदिर तसेच नवीन संसद भवनाच्या इमारतीकरिता चंद्रपूरचे काष्ठ पाठवण्यात आले आहे. बांबू हा आधुनिक कल्पवृक्ष असून रोजगार निर्मितीसाठी बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था चंद्रपुरात सुरू करण्यात आली आहे. ताडाळी एम.आय.डी.सी.मध्ये फर्निचर क्लस्टरसाठी १० एकर जागा उपलब्ध झाली आहे. या क्लस्टरला विकसित



करण्यासाठी राज्यासोबतच केंद्राचा सुद्धा निधी मिळू शकतो, त्या दृष्टीने बांबू विकास महामंडळाने प्रस्ताव तयार करावा.पुढे वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले, सुतार समाजाला देवाने विशेष देणगी दिली आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा केली तर येथील फर्निचर अमेरिकेच्या व्हाईट हाऊस मध्ये सुद्धा पोहोचवण्याची आपली क्षमता आहे. बांबू विकास महामंडळ ही केवळ नफा कमवणारी कंपनी नसून सामाजिक दायित्वातून रोजगार देणारी कंपनी करण्याचा आपला प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांनी सुद्धा केवळ पुस्तकी ज्ञानात न राहता जनतेच्या मनावर आपण केलेल्या कामाचा सकारात्मक परिणाम कसा होऊ शकतो, या दृष्टीने काम करणे गरजेचे आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी फर्निचर या व्यवसायाला प्रोफेशन म्हणून निवडावे. विद्यार्थ्यांना या विषयाची गोडी निर्माण होण्यासाठी फॉरेस्ट इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने फर्निचर क्लस्टर या उपक्रमाची कन्सेप्ट नोट अतिशय चांगली बनवणे आवश्यक आहे. मनातला विचार कागदावर येणे, कागदावर लिहिलेला विचार संगणकामध्ये उतरवणे आणि संगणकातील उत्कृष्ट कलाकृती फर्निचरमध्ये रूपांतरित करण्यासाठी आपल्या कल्पक बुद्धीचा विद्यार्थ्यांनी वापर करावा.पुढील विश्वकर्मा जयंतीच्या दिवसापर्यंत प्रगत काष्ठ प्रक्रिया व सुविधा केंद्रात विश्वकर्मांचा पुतळा बसवण्याची नियोजन करण्यासाठी बांबू विकास महामंडळाने कामाची गती वाढवावी. तसेच गावकऱ्यांनी सुद्धा या फर्निचर क्लस्टरचा उपयोग घ्यावा, असे आवाहन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. प्रगत काष्ठ प्रक्रिया व सुविधा केंद्रात काष्ठ आधारीत, बांबु आधारीत आणि अकाष्ठ वनोपज आधारीत उद्योगांच्या विकासासाठी सर्वसमावेशक प्लॅटफॉर्म उपलब्ध होईल. या प्रकल्पात क्लस्टरची ओळख करणे, क्लस्टरमधील स्थानिक कारागिरांची क्षमता बांधणी करणे, त्यांना सुविधा केंद्र उपलब्ध करून देणे आणि स्थानिक कारागिरांना रोजगाराची संधी उपलब्ध करणे या घटकांचा समावेश आहे. सोबतच या केंद्रात काष्ठ आधारीत फर्निचर, दरवाजे, चौकट, पॅलेट्स, कलाकृती इत्यादी उत्पादनाच्या निर्मितीस प्रोत्साहन देणे, त्यांच्याशी निगडीत लघु उद्योगांचे सक्षमीकरण व कौशल्य विकास करणे, काष्ठ उद्योजकांना प्रोत्साहन देऊन त्यांचे उत्पन्न वाढविणे व तयार उत्पादनाच्या विपणनासाठी पुरवठा साखळी तयार करणे, रिटेल शोरुमच्या माध्यमातून शेवटच्या उपभोक्त्यापर्यंत या वस्तु पोहचविणे ही प्रमुख उद्दिष्टे आहेत.

### कौशल्य विकासासाठी दरवर्षी १०० स्थानिक कारागिरांना प्रशिक्षण

चंद्रपूर येथील या उपक्रमासाठी ५० कोटी एवढा निधी गुंतविला जाणार असून येथे दरवर्षी १ लक्ष घनफूट लाकडावर प्रकिया करण्याची क्षमता आहे. तसेच दरवर्षी ५० हजार पर्यंत मनुष्य दिवस निर्माण होतील. कौशल्य विकासासाठी दरवर्षी जवळपास १०० स्थानिक काष्ठ कारागिरांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. उपक्रमात काम करणारे तसेच प्रशिक्षण प्राप्त करणा-या स्थानिक कारागिरांना त्यांचा स्वत:चा उद्योग सुरू करण्याची सूवर्णसंधी यामुळे प्राप्त होणार आहे.

### सुतार काम करणाऱ्या कामगारांचा सत्कार

वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते सुतार काम करणारे सतीश मानुसमारे, महादेव वांढरे, बबनराव राखुंडे, जगन्नाथ गहूकर, सुरेश रासेकर आणि सुनीता पिंपळकर यांचा तसेच एस. आर. एम. सोशल वर्क कॉलेजच्या प्राचार्य जयश्री कापसे - गावंडे आणि डॉ. सुभाष गिरडे यांच्यासह अनुराग चांदेकर, वैष्णवी ठाकरे, नीलिमा कारमेंगे या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

---

### आम्ही उद्योगांसाठी रेड कारपेट टाकतोय

## तर उद्योगांनीही स्थानिकांसाठी ग्रीन सिग्नल ठेवावा-आ.किशोर जोरगेवार






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरात आजवर प्रदूषण निर्माण करणारेच उद्योग आलेत. परिणामी ४० टक्के पेक्षा अधिक वन आच्छादन असुनही चंद्रपूर जिल्हा प्रदुषणाच्या बाबतीत देशात ओळखला जातो. असे असतांनाही आम्ही उद्योगांसाठी रेट कारपेट टाकत आहोत. तर उद्योगांनीही आपल्या उद्योगात स्थानिकांसाठी कायम ग्रिन सिग्नल ठेवावा असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

महाराष्ट्र औद्योगीक विकास मंडळ, जिल्हा प्रशासन आणि एम.आय.डी सी असोशिएशनच्या वतीने ॲडव्हान्टेज चंद्रपूर २०२४ इंडस्ट्रीयल एस्पो आणि बिजझनेस कॉन्व्लेव्हरचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला वन मंत्री तथा जिल्हाचे पालकमंत्री सुधिर मुनगंटीवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग मंत्री मंगलप्रभात लोढा, जिल्हाधिकारी विनय गौडा, एमआयडीसी असोशिएशनचे अध्यक्ष मधुसूदन रुंगठा यांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, चंद्रपूर हे देशाच्या मध्यभागी असलेले ठिकाण आहे. येथे दळनवळणाची साधने आहे. विज, पाणी, कोळसा, भूमी या सर्व गोष्टी येथे उपलब्ध आहेत. एंकदरित विचार केल्यास उद्योग वाढीसाठी पूरक असे वातावरण चंद्रपूरात आहे. त्यामूळे येथे उद्योग आले पाहिजे. मात्र हे उद्योग येथे येत असतांना स्थानिकांचाही विचार होणे अपेक्षित आहे. यातुन स्थानिकांसाठी रोजगार निर्मिती व्हावी असेही ते यावेळी म्हणाले.चंद्रपूरात पाच हजार मेगावॅट पेक्षा अधिक विज आम्ही उत्पादीत करतो. ही थर्मल एनर्जी आहे. त्यामुळे प्रदुषणाचा सामना आम्हाला करावा लागत आहे. मागील वर्षी ३० पैकी ३० दिवस प्रदुषीत राहिल्याचा अहवाल आला आहे. असे असताना या विद्युत केंद्राचा फायदा आम्हाला नाही. त्यामुळे मोबदला स्वरूप जिल्ह्याच्या विकासासाठी उद्योगांना सवलतीच्या दरात विज दिल्या गेली पाहिजे असेही ते यावेळी बोलतांना म्हणाले. या कार्यक्रमात उद्योजकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

---

## कागलमध्ये बांधकाम कामगारांना संसारोपयोगी भांडी संच, शिष्यवृत्ती व घर अनुदानाचे वाटप

**कागल । प्रतिनिधी**

गेल्या ३०-३५ वर्षांच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत गोरगरीब जनताच माझी कवचकुंडले म्हणून सोबत राहिली. त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी माझी प्रयत्नांची पराकष्टा आहे, असे भावनिक उद्गार वैद्यकीय शिक्षण विशेष सहाय्य मंत्री तथा; पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी काढले.

कागलमध्ये श्री. शाहूनगर बेघर वसाहतीमध्ये आयोजित कार्यक्रमात मंत्री हसन मुश्रीफ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. येथील बांधकाम कामगारांना गृहपयोगी भांडी संचाचे वितरण व दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत ३० लाख निधी खर्चाच्या सांस्कृतिक हॉलचा पायाभरणी श्री. मुश्रीफ यांच्या हस्ते झाला. तसेच; यावेळी बांधकाम कामगारांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती व घर बांधकामासाठी अनुदानाच्या धनादेशांचेही वाटप झाले.भाषणात मंत्री श्री. मुश्रीफ पुढे म्हणाले, येत्या काळात विविध मंडळे स्थापन करून महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या साडेचार कोटी कामगारांच्या जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे. साडेचार कोटींपैकी फक्त ८० लाखावर कामगार नोंदीत कामगार आहेत. उर्वरीत शेत कामगार, कापड उद्योग कामगार, हॉटेल व्यवसायातील कामगार, ट्रक चालक, रिक्षा चालक तसेच इतर मोठ्या प्रमाणात काम करणाऱ्यांसाठी मंडळे स्थापन करून त्यांचेही जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करता येईल. भारत देश महासत्ता बनविण्याचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी व देशाची अर्थव्यवस्था जगात पहिल्या तीनमधे



आणण्यासाठी सर्वसामान्यांचे जीवनमान सुधारणे आवश्यक आहे. त्यासाठीच येत्या काळात कामगारांसाठी प्राधान्याने शासनाकडून विविध योजना आणण्याचे प्रयत्न करणार असल्याचे, ते यावेळी म्हणाले.केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने म्हणाले, बांधकाम कामगारांच्या कल्याणकारी योजनांचे खरे जनक पालकमंत्री नामदार हसन मुश्रीफ आहेत. बांधकामांवर एक टक्का सेस लावून त्यांनी कामगारांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने सुखसमृद्धी आणली.माजी नगराध्यक्ष प्रकाशराव गाडेकर म्हणाले, पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या कामाची नक्कल करून काहीजण आमदार झाल्याच्या आविर्भावात फिरत आहेत. परंतु; त्यासाठी पहाटे पाचपासून रात्री अकरा - बारापर्यंत जनतेची सेवा करावी लागते. गोरगरिबांच्या प्रश्नांची तळमळ आणि जाण असावी लागते. दुसऱ्यांनी केलेल्या कामाची नक्कल करून त्यांना हे उद्दिष्ट कधीच साध्य होणार नाही.यावेळी गोकुळचे ज्येष्ठ संचालक युवराज पाटील (बापू), केडीसीसी बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैया माने, श्रीनाथ समूहाचे चंद्रकांत गवळी, माजी नगराध्यक्ष प्रकाशराव गाडेकर, नवल बोते, कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी युवकचे अध्यक्ष नितीन दिंडे, माजी उपनगराध्यक्ष प्रवीण काळबर, सौरभ पाटील, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय चितारी, सागर गुरव, नूतन गाडेकर, अर्जुन नाईक, नवाज मुश्रीफ, संदीप भुरले, गौतम गाडेकर, बच्चन कांबळे, अशोक रावण, भिकाजी देवकर, अशोक वड्ड, भारत मोरे, उमेश पाटील, कुशाल कानडे, महेश कल्ले, संतोष पोवार, विजय दाभाडे, रोहित सोनुले, विनोद वाघेला, प्रथमेश जांभळे, विशाल बेनाडे, उदय पाटील, उत्तम पाटील, दीपक शिंदे, प्रकाश वाघमारे, सुभाष सुतार, बजरंग मिसाळ, संजय पोवार, बाळू सोनुले, सागर सोनुले, शब्बीर नगारजी, रामा सोनुले, सचिन कोरवी आदी प्रमुख उपस्थित होते.

---

# वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थानाचे भूमिपूजन व बॅरेकचे लोकार्पण

## कारागृह हे सुधारगृह व्हावे-ना.सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कारागृहात राहणे ही म्हटले तर शिक्षा आहे आणि एका दृष्टीने दीक्षाही आहे. वाल्याचा वाल्मिकी झाल्याची कथा सर्वांनी ऐकली आहे. आज तुम्ही सारे आंधारात आहात, कदाचित चांगल्या वर्तणुकीने उद्या प्रकाशात याल. बाहेर आल्यानंतर तुमच्या हातून उत्तम काम व्हावे, यासाठी हे केवळ कारागृह न राहता सुधारगृह व्हावे, अशी अपेक्षा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

जिल्हा कारागृह येथे वरिष्ठ तुरुंगाधिकारी निवासस्थानाचे भूमिपूजन व महिला - पुरुष बंदीसाठी स्वतंत्र बॅरेक्सचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. यावेळी कारागृहाचे अधिक्षक अनुपकुमार कुमरे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, अभियंता येरगुडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य डॉ. मंगेश गुलवाडे,





वरिष्ठ तुरुंगाधिकारी सतिश सोनवणे, नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी महेश माळी, जनरल सुभेदार महेंद्र हिरोळे आदी उपस्थित होते.येथील निवासस्थान व इतर सुविधांसाठी जिल्हा नियोजन समितीमधून २ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, असे सांगून पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, क्षमतेपेक्षा जास्त संख्या या कारागृहात आहे. चार वर्षांपूर्वी येथील व्यवस्थेची पाहणी केली असता विविध सोयीसुविधांसाठी १४ कोटी रुपये दिले. हा केवळ तुरुंग न राहता हे सुधार केंद्र व्हावे, यासाठी ३३ कोटींची मागणी करण्यात आली आहे. कारागृहाची क्षमता ४८६ असून सद्यस्थितीत येथे ७२० कैदी आहेत. त्यामुळे क्षमतेमध्ये तसेच सोयीसुविधांमध्ये वाढ करण्याच्या सुचना प्रशसनाला दिल्या आहेत.पुढे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले, येथे वाचनालय आणि खेळाचे प्रकार आहेत. कैद्यांना वाचण्यासाठी उत्तमातीत उत्तम पुस्तके आपण स्वत:च्या निधीमधून देण्यासाठी तयार आहोत. प्रत्येकाच्या मनात द्वंद सुरू असते. त्यामुळे चांगली आणि दर्जेदार पुस्तके वाचली तर मनातील द्वंद संपुष्टात येऊ शकते. या कारागृहात आयुष्याचे तत्व शिकण्याचे, उत्तम संस्काराचे शिक्षण मिळावे, अशी अपेक्षा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांनी कारागृह परिसरात असलेल्या हजरत मखदुम शहाबुद्दीन शहा यांच्या दर्ग्याला भेट देऊन पाहणी केली. तसेच चादर चढवून प्रार्थनासुध्दा केली. सोबतच कारागृहाच्या नवीन बराकीचे आणि येथे कैद्यांसाठी नव्याने बांधलेल्या रुग्णालयाचे उद्घाटन पालकमंत्री मुनगंटीवार यांनी केले.

### १४ कोटी रुपयांतून झालेल्या सुविधा

चंद्रपूर जिल्हा कारागृहात ५०० बंद्यांकरीता नवीन बॅरेक्सचे बांधकाम व अन्य अनुषंगिक कामांतर्गत पुरुष बंद्यांकरीता २ बॅरेक इमारतींचे बांधकाम, महिला बंद्यांकरीता बॅरेक इमारत, पुरुष विभक्त बंदी कक्ष, महिला विभक्त बंदी कक्ष, दवाखाना, तपासणी कक्ष, पुरुष कक्ष, महिला कक्ष, औषध भांडार आदी कामे करण्यात आली आहेत.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .